


दैनिक

महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक १५२ •सोमवार, दि. ०१ सप्टेंबर २०२५ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रूपये

• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955



# फडणवीसाना कसला ही घाम फुटेना!

## आज पासून पाटलानी पाणी वर्ज्य केले

## चार दिवसापासून पोटात अन्नाचा कणही नाही

मुंबई । प्रतिनिधी

**मराठा समाजाला आरक्षण दिलं नसल्याने प्रचंड मोठी वेदना आहे. मुंबईत मराठा बांधवांची केवळ गर्दी झाली आहे, असे सरकारने समजू नये, तर वेदना समजावी. उद्यापासून पाणीही बंद करणार आहे. आरक्षण घेतल्याशिवाय मुंबई सोडणार नाही, असा इशारा मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी आज राज्य सरकारला दिला. ते आझाद मैदानावर पत्रकार परिषदेत बोलत होते.**

मराठा मोर्चा आणि आर क्षणाबाबत सर्व गोष्टींची उत्तरे एकनाथ शिंदेच देऊ शकतील. मनोज जरांगे परत का आले याचेही उत्तर एकनाथ शिंदेंना विचारा, अशा शब्दात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर निशाणा साधला होता. यावर बोलताना जरांगे म्हणाले की, दोघे ठाकरे भाऊ आणि ठाकरे बँड चांगला आहे. पण राज ठाकरे विनाकारण मराठ्यांच्या प्रश्नात पडतात. त्यांना ११ ते १३ आमदार निवडून दिले पण ते पळून गेले. लोकसभेला फडणवीसांनी त्यांचा गेम केला. विधानसभेला मुलाचा पराभव केला. राज ठाकरे म्हणजे मानाला भुकालेलं पोरग आहे. घरी फे फडणवीस चहा पिऊन गेलेत तर मग पक्ष बरबाद झाला तरी चालतो, अशा शब्दात जरांगे यांनी राज ठाकरेंवर निशाना साधला.

चंद्रकांत पाटील यांनी मुलांसाठी चांगल काम केलं म्हणून त्यांच्यावर बोलायच कमी केलं होतं. उपसमितीचे अध्यक्ष असताना मुख्यमंत्र्यांच्या सांगण्यावरून त्यांनी वैधता थांबवली होती, हे आम्हाला माहिती आहे. त्यांनी यापुढे शांत राहवं, मराठ्यांच्या शिव्या खाऊ नका, असा इशारा जरांगे यांनी मंत्री चंद्रकांत पाटील यांना दिला.



**• आरक्षण घेतल्याशिवाय मुंबई सोडणार नाही**

**सरकार मागण्यांची अंमलबजावणी करत नाही, त्यामुळे उद्यापासून पाणी बंद करणार. सरकार कितीही अन्याय करूदे मराठा समजाने शांत रहावे, दगडफेक करू नका, तुम्हाला आरक्षण मिळवून दिल्याशिवाय मुंबई सोडणार नाही, असे आवाहन जरांगे यांनी आंदोलकांना केले.**

# प्रसिद्ध अभिनेत्री प्रिया मराठेचं निधन

## वयाच्या ३८ व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास

मुंबई । प्रतिनिधी



प्रसिद्ध अभिनेत्री प्रिया मराठेचं निधन झालं आहे. वयाच्या ३८ व्या वर्षी प्रियाने अखेरचा श्वास घेतला. मागील बऱ्याच काळापासून प्रिया मराठे कर्करोगाशी झुंज देत होती. पवित्र रिश्ता या मालिकेच्या माध्यमातून प्रिया ही देशभरामध्ये हिंदी भाषिकांच्या घरोघरी ओळखीचा चेहरा झाली होती. अनेक मालिकांमध्ये प्रभावशाली कामगिरी करणाऱ्या प्रियाचं एवढ्या लहान वयात निधन झाल्याबद्दल हळहळ व्यक्त केली जात आहे.

पहाटे चार वाजता प्रियाचं मीरा रोड येथे निधन झालं. प्रियाच्या पार्थिवावर सायंकाळी चार वाजता अंतिम संस्कार केले जाणार असल्याची माहिती मिळत आहे. प्रिया मराठे गेल्या वर्षभरापासून कर्करोगाशी झुंज देत होत्या आणि या आजारामुळे त्या लाइमलाइटपासून दूर होत्या. प्रिया मराठेचा जन्म २३ एप्रिल १९८७ रोजी ठाण्यात झाला. २००६ साली 'या सुखांनो या' या मराठी मालिकेतून तिने छोट्या पडद्यावर पदार्पण केलं. त्यानंतर विविध मराठी आणि हिंदी मालिकांमधून ती वेळोवेळी प्रेक्षकांच्या भेटीस आली. प्रिया मराठेने श्रीकांत मोघे यांचा मुलगा ▶▶ उर्वरित पान २ वर

# मराठा आरक्षणासाठी दोन तरुणाची आत्महत्या

## मराठा आरक्षणासाठी तरूणाची गळफास लावून आत्महत्या

अंबाजोगाई । प्रतिनिधी



मुद्याने सध्या राज्यातील सामाजिक आणि राजकीय वातावरण तापलेलं आहे. मुंबईतील आझाद मैदानात मनोज जरांगेंनी बेमुदत उपोषण सुरू केले आहे. या दरम्यान अंबाजोगाई तालुक्यातील सुगाव येथे आज (शनिवार) एका तरूणाने मराठा आरक्षणाच्या मागणी करत थेट गळफास लावून आत्महत्या केल्याचे समोर आले आहे. मनोज जरांगे पाटील यांनी आझाद मैदानावर सुरू केलेल्या बेमुदत उपोषणानंतरही, मराठा आरक्षणाबाबत अद्यापर्यंत कुठलाही तोडगा निघाला नसल्याने आलेल्या नैराश्यातून नितीन माणिकराव चव्हाण या तरुणाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची माहिती समोर आली आहे. तशा आशयाच्या पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. दरम्यान, या घटनेमुळे सुगाव गावावर शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्ये केली जात आहे.

## आर्थिक अडचणीमुळे मुंबईला जाता आलं नाही म्हणून नैराश्येत होता

बीड । प्रतिनिधी



मराठा आरक्षणासाठी संघर्ष योद्ध मनोज जरांगे पाटील यांचे २९ ऑगस्टपासून मुंबईमध्ये आंदोलन सुरु आहे. या आंदोलनात सहभागी होण्यासाठी आर्थिक विवंचनेमुळे जाता येत नसल्यामुळे एक तरुण विषारी औषध पिला होता. उपचारा दरम्यान आज सकाळी त्याचा मृत्यू झाला. त्याच्या या निधनाने आहेरवडगाव येथे हळहळ व्यक्त केली जात आहे. मराठा आरक्षणाचा लढा गेल्या अनेक वषारपासून सुरु आहे. २९ ऑगस्टपासून मनोज जरांगे पाटील हे मुंबई येथे आमरण उपोषण करत आहेत. त्यांना समर्थन देण्यासाठी राज्यभरातून लाखो मराठा बांधव मुंबईत दाखल झाले. आरक्षणाचा प्रश्न कधी मार्गी लागेल, मुंबईला जाण्यासाठी आपली आर्थिक परिस्थिती नसल्याने नैराश्येत असलेल्या आहेरवडगाव येथील भरत यादव खरसाडे (वय २२ वर्षे) या तरुणाने २७ ऑगस्ट रोजी विषारी प्राशन केल्याने त्याला उपचारार्थ बीड येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारा दरम्यान त्याचा मृत्यू झाला.

# मांजरा धरणाचे चार दरवाजे उघडले

## नदीकाठच्या गावांना सावधानतेचा इशारा

बीड । प्रतिनिधी

गेल्या चार दिवसांपासून मांजरा धरणाच्या दोन दरवाज्यातून पाण्याचा विसर्ग करण्यात येत होता मात्र पाण्याची आवक वाढल्याने आज या धरणाचे चार दरवाजे आणखी उघडून मांजरा नदी पात्रात ०.२५ मि.ने पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे. मांजरा नदीला कधीही पूर येऊ शकतो म्हणून पाटबंधारे विभागाच्या वतीने नदीकाठच्या गावांना सावधानतेचा इशारा ▶▶ उर्वरित पान २ वर



# कॅश डिपॉझिट मशीनमध्ये बनावट नोटा टाकताना तरुण सीसीटीव्हीत कैद

**• संशयितावर गुन्हा दाखल, शोध सुरू**

बीड । प्रतिनिधी

एचडीएफसी बँकेच्या एटीएममध्ये म्हणजेच कॅश डिपॉझिट मशीनमध्ये पाचशे रुपयाच्या बनावट नोटा टाकण्याचा प्रयत्न केला गेला. जेव्हा एचडीएफसी बँकेच्या कर्मचाऱ्यांनी सीसीटीव्ही फुटेज पाहिले तेव्हा संबंधित ग्राहकाबाबत संशय व्य३त झाला असता त्यांनी याबाबत शिवाजीनगर पोलिसांना



माहिती दिली. सीसीटीव्ही फुटेज, नोटांवरील नंबर यासह अन्य बाबी तपासल्यानंतर संबंधित व्य३तीवर बँक प्रशासनाच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला. संबंधित व्य३ती हा बीड नजीकच्या पिंपरगव्हण येथील असल्याचे सांगण्यात येते. प्रकरण बनावट नोटांचा असल्याने पोलीस या प्रकरणी गोपनीय पद्धतीने तपास करत असल्याचे सांगीतले जाते. गेल्या महिन्याभरापूर्वी अहिल्यानगर आणि संभाजीनगर येथून बनावट नोटा छापणाऱ्या लोकांविरोधात मोठी कारवाई करण्यात ▶▶ उर्वरित पान २ वर

# सौतड्याचा धबधबा कोसळू लागला!



बीड । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यात असलेला आणि 'मिनी महाबळेश्वर' म्हणून ओळखला जाणारा सौताडा येथील रामेश्वर धबधबा सततच्या दमदार पावसाने कोसळू लागला आहे. सलग तीन दिवस झालेल्या मुसळधार पावसामुळे विंचरणा तलाव शंभर टक्के क्षमतेने भरून वाहू लागला असून, त्याचा पुरेसा विसर्ग होताच धबधबा दिमाखदार ताकदीने कोसळू लागला आहे. गत दोन वषारच्या काळानंतर धबधबा यंदा प्रथमच एवढ्या मोठ्या क्षमतेने प्रवाहित झाला आहे. त्यामुळे परिसरात निसर्गरम्य वातावरण निर्माण झाले असून, धबधब्याचे विहंगम दृश्य पाहण्यासाठी निसर्गप्रेमी, पर्यटक आणि स्थानिक नागरिकांची गर्दी होत आहे. निसर्गाच्या या अद्भुत लीलेला डोळ्यांनी टिपण्यासाठी अनेकजण मोबाईल ▶▶ उर्वरित पान २ वर

# आवं कुठून ? भाकर, पिटलं, ठेचा आलाय गावागावातून;

## मुंबईत आंदोलकांसाठी अन्नपाणी, कुणीही नाही उपाशी

मुंबई । प्रतिनिधी

मुंबईत उपोषणाला बसलेल्या मनोज जरांगे यांना पाठिंबा देण्यासाठी अनेक मराठा बांधव राज्यभरातून गेले आहेत. पाठिंबा देण्यासाठी गेलेल्या आंदोलकांना त्यांच्या जेवणाची सोय व्हावी यासाठी विविध जिल्ह्यातून आज सकाळीच मोठ्या प्रमाणात जेवण मुंबईत पोहोचलं. पुणे, बीड, सोलापूर, लातूर, परभणी, संभाजीनगर जिल्ह्यातून गाड्या भरुन भाकरी आणि कोरड्यास आंदोलकांसाठी आणण्यात ▶▶ उर्वरित पान २ वर





# ज्येष्ठा गौरी आणि श्री गणेश: आपुलकीची सांस्कृतिक धारा

गणेशोत्सवाच्या उत्साहात महाराष्ट्रात घराघरांत येणाऱ्या ज्येष्ठा गौरींचे आगमन हा भक्तिभाव , सौंदर्य आणि ऐक्याचा मंगल सोहळा असतो . सोन्याच्या पावलांनी आल्या सारख्या मानल्या जाणाऱ्या या गौरींचे आगमन म्हणजे घरात सुख , शांती आणि ऐश्वर्याची चाहूल लागल्यासारखी भावना प्रत्येक कुटुंबाच्या मनात दाटते . अंगणातल्या रंगीबेरंगी रांगोळ्या , फुलांच्या माळा , आरत्यांचे सूर आणि स्त्रियांच्या ओव्यांनी सजलेले वातावरण जणू परंपरा आणि आनंदाचा संगम घडवते .

ज्येष्ठा गौरी या पार्वतीचे रूपं मानल्या जातात , त्या शुद्धता , समृद्धी आणि स्त्रीशक्तीचे प्रतीक आहेत . गणेश हा पार्वतीचा पुत्र असल्याने ज्येष्ठा गौरी आणि गणेश यांचे नाते हे अतिशय घट्ट , आपुलकीचे व आई–मुलाचे स्वरूप आहे . म्हणूनच गणेशोत्सवात गौरी पूजनाचे स्थान विशेष आहे . महाराष्ट्रात हा सण विशेष भक्तिभावाने साजरा होतो . गणपतीच्या आगमनापूर्वी गौरींचे स्वागत केले जाते , त्यांना फुलांची व पारंपरिक सजावटीची आरास केली जाते , विविध नैवेद्य दाखवले जातात आणि गाणी–ओव्या म्हणत वातावरण मंगलमय केले जाते .

इतिहासाच्या संदर्भात पाहिले तर छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात पुणे परिसरात गणेशोत्सव कौटुंबिक पातळीवर दिमाखात साजरा होत असे . पुढे लोकमान्य टिळकांनी या उत्सवाला सार्वजनिक रूप देत समाजातील एकात्मतेचा ध्यास घेतला . याच काळात गौरी



पूजनालाही घराघरात धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व प्राप्त झाले . विशेषत: स्त्रियांसाठी हा उत्सव आनंदाचा , सजावटीचा आणि सामूहिक कार्यक्रमांचा मानबिंदू बनला . ज्येष्ठा गौरींच्या आगमनामुळे कुटुंबात ऐक्य , स्त्रीशक्तीचा सन्मान आणि घराघरात सुख–समृद्धी येते अशी दृढ श्रद्धा आहे .

लोककथांनुसार गौरी या महालक्ष्मीच्या बहिणी मानल्या जातात . भक्तांच्या घरी दोन दिवसांसाठी माहेरी आल्या म्हणून त्यांचे स्वागत मोठ्या आदराने केले जाते . काही ठिकाणी ज्येष्ठा आणि कनिष्ठा अशा दोन गौरी घरात आणल्या जातात . त्यांचे आगमन म्हणजे आईच्या रूपात आलेल्या देवीचे दर्शन . म्हणूनच त्यांच्यासाठी पारंपरिक पदार्थ बनवले जातात .

२०२५ मध्ये ज्येष्ठा गौरी अवहण रविवार , ३१ ऑगस्ट रोजी . मुख्य पूजन सोमवार , १ सप्टेंबर रोजी सकाळी ५ वाजून ५९ मिनिटांपासून संध्याकाळी ६ वाजून ४३ मिनिटांपर्यंत पार पडेल . विसर्जन मंगळवार , २ सप्टेंबर रोजी होईल . या तीन दिवसांत घराघरात भक्तिभाव , सजावट आणि ऐक्याचे वातावरण असते . गौरींचे स्वागत करताना अंगणात रंगीबेरंगी रांगोळ्या काढल्या जातात , हळदीकुंकवाचे समारंभ आयोजित केले जातात आणि महिला एकत्र येऊन गाणी व ओव्या गातात . गौरी आई आली अंगण फुलांनी भरलं , ये ग ये ग गौरी , ओटी भरुन दे ग , गणपती बाप्पा येती सुख समृद्धी घेऊन , गौरी आली घरोघरी , भरभरून आली संपत्ती सारी अशा ओव्या पारंपरिक वातावरणाला साजेशा ठरतात . गौरी पूजनाच्या दिवशी खास जेवणाचा बेत आखला जातो . उकडीचे मोदक , घारगे , करंजी , पुरणपोळी , पिठलं–भात , डाळ–भात , पिठाचे लाडू , हळदीचे दूध असे विविध पदार्थ नैवेद्य म्हणून ठेवले जातात . या पाककृती केवळ चवीसाठी नसून परंपरेचा वारसा आणि स्त्रियांच्या कष्टाचे व कौशल्याचे दर्शन घडवतात .

*गौरीची आरती*

*भाद्रपद शुद्ध सप्तमीस प्रतिष्ठा*
*अनुराधा नक्षत्र ज्येष्ठा श्रेष्ठा*
*गणेशा सहित गौरी धनिष्ठा*
*बैसली येउनि सकळिया निष्ठा ।।१।।*
*जयदेव जयदेव जय महालक्ष्मी, श्रीमहालक्ष्मी,*
*कृपा करुनी आली तू महालक्ष्मी जयदेव जयदेव*
*।। धृ।।*
*ज्येष्ठा नक्षत्र पुजेचा महिमा*
*षडरस पक्वान्ने होती सुखधामा*
*सुवासिनी ब्राह्मण अर्पुनी निजनेमा*
*तुझे आशीर्वादे सकलही धामा ।।२।।*
*जयदेव जयदेव जय महालक्ष्मी, श्रीमहालक्ष्मी,*
*कृपा करुनी आली तू महालक्ष्मी जयदेव जयदेव*
*।। धृ।।*
*उत्थापन मूळावर होता अगजाई*
*वर देती झाली देवी विप्राचे गृही*
*रुद्र विश्वनाथ भक्ताचे ठायी*
*वर देती झाली देवी सकळांचे गृही ।।३।।*
*जयदेव जयदेव जय महालक्ष्मी, श्रीमहालक्ष्मी,*
*कृपा करुनी आली तू महालक्ष्मी जयदेव जयदेव*
*।। धृ।।*

गौरी पूजनाचे महत्व केवळ धार्मिक नाही तर सामाजिक दृष्ट्याही आहे . हा सण म्हणजे कुटुंबातील स्त्रियांचा आत्मसन्मान , समाजातील बंधुता आणि शेजारधर्माचे प्रतिक आहे . समाजातील बंध दृढ करण्यासाठी , शेजाऱ्यांत मैत्री वाढवण्यासाठी आणि एकोप्याचे वातावरण निर्माण करण्यासाठी गौरी पूजनाची परंपरा आजही उपयुक्त ठरते . ज्येष्ठा गौरींचे आगमन म्हणजे घराघरात आनंदाचा , सौहार्दाचा व ऐश्वर्याचा प्रकाश पसरवणे होय .

नवीन पिढीसाठी या उत्सवाचा संदेश अत्यंत महत्त्वाचा आहे . आजच्या धावपळीच्या जीवनात गौरी पूजनामुळे कुटुंब एकत्र बसते , परंपरा जपल्या जातात , संस्कृतीचा वारसा पुढे नेला जातो आणि समाजात ऐक्याची भावना वाढीस लागते . गौरी पूजन हा स्त्रीशक्तीचा गौरव करणारा सण आहे . म्हणूनच ज्येष्ठा गौरींचे पूजन म्हणजे केवळ धार्मिक विधी नसून स्त्रीशक्तीचा सन्मान , परंपरेचा वारसा आणि सामाजिक सलोख्याचा अनमोल ठेवा आहे .

# बाल कुपोषण : पोषण संरक्षणाची गरज

राज्यातील बालकांचे कुपोषण रोखण्यासाठी विविध प्रकारच्या उपयोजना आज अमलात असल्या तरी त्या अपयशी ठरत आहेत. त्यामुळे पाच वर्षाखालील प्रत्येकी तीन पैकी एक बालक कुपोषित असल्याचा धक्कादायक निष्कर्ष अलीकडेच भारतीय लोकसंख्या विज्ञान संस्थेच्या (आयआयपीए) या अभ्यासाच्या अहवालातून म्हटल्याचे वृत्त समोर आले. या अभ्यास अहवालानुसार राज्यात पाच वर्षाखालील पस्तीस टक्के मुले वाढ खुंटलेली व कमी वजनाची आणि सव्वीस टक्के कुपोषित आहे. म्हणजेच प्रत्येकी तीन पैकी एक मूल कुपोषित असल्याचा निष्कर्ष या संस्थेने काढला आहे.तसेच (आयआयपीए) च्या सुक्ष्म अभ्यासानुसार राज्यात १९९२मध्ये मध्यम कुपोषणाचे प्रमाण विस टक्के होते. ते २०२१ मध्ये सव्वीस टक्क्यांवर पोहचले. जन्माच्या वेळी बाळाचे वजन कमी. लहान वयात मातृत्व. शिक्षणाचा अभाव.अस्वच्छ राहणीमान. आणि स्तनपानाचा विलंब या बाबी बालकांच्या कुपोषणास कारणीभूत ठरल्या होत्या व आजही बहुतांशी त्या कायम आहेत. बाल कुपोषणाच्या संदर्भात २०१४ पासून तर २०२१ पर्यंत पोषण स्थितीत फारसा असा बदल झाला नाही, त्यामुळे कुपोषणाची तीव्रता ही दिवसेंदिवस वाढतचं आहे.

ग्रामीण भागातील वाढत्या कुपोषणाच्या संदर्भात सामाजिक व आर्थिक विषमता, पोषण आहाराचा अभाव आणि अपुरी आरोग्य व्यवस्था हे घटक कारणीभूत आहे. तर शहरी भागातील कुपोषणांच्या प्रमुख कारणांमध्ये ग्रामीण भागातून शहरांकडे होणाऱ्या स्थलांतरित मजुरांची वाढती संख्या होय. तसेच त्यांचे अत्यंत निकृष्ट जीवनमान मानले पाहिजे. खेड्यातून रोजगारासाठी महानगरांकडे स्थलांतरित होणाऱ्या या कुटुंबीयांना ना पुरेशी आरोग्य सुविधा असते, ना सकस पोषण आहार, ना शुद्ध पिण्याचे पाणी. हात मजुरीवर काम



करणाऱ्या लाखों कुटुंबावर दोन वेळेचे पोटभर अन्न मिळण्याची क्षमता नाही. त्यात निरक्षरता, आर्थिक चणचण, महिला व बालकांच्या आरोग्याची होणारी हेळसांड,वाढती महागाई, ढासळती आर्थिक परिस्थिती अशा अगणित समस्यांच्या गर्तेत मुलांना सकस आहाराचा पुरवठा पाल्यांच्या आवाक्या बाहेरच्या ठरतात. आज सकस पोषण आहारांच्या अभावामुळे कुपोषणाची अधिकाधिक तीव्रपणे होत आहे.

बाल कुपोषण कमी करण्याच्या संदर्भात राज्य शासनाच्या अनेक योजना कार्यान्वित आहेत. लाखो आरोग्य कर्मचारी, विविध टास्क फोर्स, शिबिरे सुद्धा उभारली जातात. आर्थिक बजेटमध्ये तरतुदी केली जाते. तरीसुद्धा बाल कुपोषणाची तीव्रता दिवसेंदिवस वाढताना दृष्टीस पडते. शासन पातळीवर 'इंटिग्रेटेड चाइल्ड डेव्हलपमेंट सर्व्हिसेस' , 'मिशन पोषण २.०', 'सुपोषण अभियान' अशा योजनांची आखणी आहे. परंतु याही योजना नेहमीप्रमाणे लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत नाही. शहरी भागातील बालकुपोषण हे स्थलांतरित कुटुंबीयांच्या बालकांची संबंधित आहे.यातील बालके शाळाबाह्य आहेत. त्यामुळे शालेय पोषण आहाराचा कुठलाही लाभ यांना मिळत नाही. कुपोषणाच्या बाबतीत पोषण शिक्षण हे महत्त्वाची बाब आहे. मात्र त्याची पूर्तता सुलभ होणे जरुरीचे आहे. राज्यात एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महिला व बालकल्याण विकास विभागाच्या माध्यमातून अंगणवाडी योजना राबविण्यात येते.ही योजना मुख्यत्वें शून्य ते सहा वर्षे वयोगटातील बालकांच्या भौतिक, शारीरिक आणि सर्वांगीण विकासासाठी आहे.पोषणयुक्त आहार, लसीकरण,आरोग्य तपासणी, आरोग्य शिक्षण, औपचारिक शालेय शिक्षण केंद्रातून देण्याचा व्यापक प्रयत्न व्हायला हवा.

राज्यातील कुपोषण मुक्तीसाठी काम करणाऱ्या ग्रामीण भागातील अंगणवाड्या आज स्वतःच्या इमारतीविना आहेत. समाज मंदिरात, पत्र्यांच्या शेडमध्ये, भाड्याच्या जागेत, तर कुठे उघड्या झाडाखाली सुद्धा भरतात. त्यात मोठी सुधारणा आज अपेक्षित आहे. बाल कुपोषणाच्या समस्येवर मात करीत असताना कुपोषित बालकांच्या पालकांचे स्थलांतर थांबवले पाहिजे. कुपोषित बालकांच्या कुटुंबांचे विशेष सर्वेक्षण करून त्यांच्या सकस पोषणावर भर देणे गरजेचे ठरते. कुपोषणाची समस्या ही आरोग्याशी संबंधित नव्हे, तर विकासाची आणि आर्थिक प्रगतीची समस्या आहे. त्यामुळे बाल कुपोषण नियंत्रण आणि बालकांना सकस पोषण संरक्षण पुरविण्यासाठी सर्वोतोपरी प्रामाणिक प्रयत्न होणे आवश्यक आहे.

**– शशिकांत मधुकर तोटे,**
**दारव्हा, जि. यवतमाळ**

◆ पान १ वरून पुढे...

## प्रसिद्ध अभिनेत्री...

शंतनू मोघेसोबत २४ एप्रिल २०१२ रोजी लग्न केलं होतं. शंतनू स्वतः एक अभिनेता आहे. प्रियाच्या मागे पती आणि आई असा परिवार आहे. 'कसम से', 'पवित्र रिश्ता', 'बडे अच्छे लगते है', 'चार दिवस सासूचे', 'तू तिथे मी', 'कॉमेडी सर्कस' इत्यादी मालिकांमध्ये प्रियाने आपल्या अभिनयाची छाप सोडली. त्याच प्रियाने मराठी चित्रपटसृष्टीमध्येही काम केलं.२०१६ साली प्रदर्शित झालेल्या 'विघ्नहर्ता महागणपती' चित्रपटात प्रिया झळकली होती. तसेच याच वर्षी प्रदर्शित झालेल्या 'किरण कुलकर्णी व्हर्सेस किरण कुलकर्णी' चित्रपटातही तिने महत्त्वाची भूमिका साकारली होती. प्रिया मराठे यांचं निधन ३१ ऑगस्ट २०२५ रोजी पहाटे ४ वाजता मीरा रोड, मुंबई येथे कर्करोगामुळे झालं. त्या गेल्या वर्षभरापासून कर्करोगाशी झुंज देत होत्या. प्रिया मराठे यांचं निधन वयाच्या ३८ व्या वर्षी झालं. त्या २३ एप्रिल १९८७ रोजी जन्मल्या होत्या. प्रिया यांच्या पार्थिवावर ३१ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ४ वाजता अंतिम संस्कार केले जाणार आहेत. प्रिया मराठे यांचा जन्म २३ एप्रिल १९८७ रोजी ठाणे, महाराष्ट्र येथे झाला. त्यांनी आपलं शिक्षण मुंबईतील शाळा आणि महाविद्यालयात पूर्ण केलं आणि नंतर नाट्य क्षेत्रात प्रवेश केला.

## मांजरा धरणाचे...

देण्यात आला आहे. दुपारी दीड वाजता मांजरा धरणाचे गेट क्र. १, ३,४ आणि ६ उघडण्यात आले आहेत. या दरवाज्यातून ३ हजार ४९४ ३युसेस पाण्याचा विसर्ग करण्यात येत असून ०.२५ मिटराने मांजरा नदी पात्रात पाणी सोडण्यात येत आहे. त्यामुळे नदीकाठी असलेल्या सोनीसांगवी, सुर्डी व इतर जवळपास ३२ गावांना पाटबंधारे विभागाच्या वतीने सावधानतेचा इशारा देण्यात आला आहे. मांजरा धरण पाठोपाठ वडवणी तालु३यातील उर्ध्व कुंडलिका प्रकल्पाचेही दोन दरवाजे उघडण्यात आले असून या धरणातून १६८३ ३युसेस पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे.

## कॅश डिपॉझिट ...

आली होती. त्या प्रकरणात बीड जिल्ह्यातील एकाला ताब्यातही घेण्यात आले होते. त्या बनावट नोटा प्रकरणाचा तपास एकीकडे चालू असताना

◆ पान १ वरून पुढे...

दुसरीकडे काल स्वराज्यनगर भागात असलेल्या एचडीएफसी बँकेच्या कॅश डिपॉझिट मशीनमध्ये एक तरुण पाचशेच्या पाच नोटा टाकत असल्याचे निदर्शनास आले. मशीनने त्या नोटा बाहेर फेकल्या म्हणून उत्सुकतेपोटी आणि संशयीवृत्तीने बँकेच्या कर्मचाऱ्यांनी तो सीसीटीव्ही फुटेज बारकाईने पाहिला तेव्हा संबंधित व्यक्ती हा बनावट नोटा डिपॉझिट करण्याचा प्रयत्न करतोय हे लक्षात आल्यानंतर बँक प्रशानाने शिवाजीनगर पोलिसांना याबाबत माहिती दिली. पोलिसांनी या प्रकरणी संबंधित व्यक्तीवर गुन्हा दाखल केला आहे. तो एचडीएफसी बँकेचा खातेदार असल्याचे समजते. विशेष म्हणजे बीड नजीकच्या पिंपरगव्हण येथील तो तरुण आहे. या प्रकरणाने एकच खळबळ उडाली आहे.

## सौतड्याचा धबधबा...

आणि कॅमेऱ्यात क्षण कैद करत आहेत. पर्यटकांची वाढती गर्दी लक्षात घेता प्रशासनाने खबरदारीचा इशारा दिला आहे. धबधब्याच्या वरील भागात पर्यटकांनी जाऊ नये, सुरक्षित अंतरावरूनच आनंद घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## आवं कुठून ? ...

आलं होतं. तर, पाण्याच्या बाटल्यांचेही मोठ्या प्रमाणावर बॉक्स उतरल्याचं दिसून आलं. मराठा बांधवांच्या पोटासाठी बारामतीकरही पुढे सरसावले. दहा हजार आंदोलकांना पुरेल एवढं जेवण उद्या बारामतीतून पाठवले जाणार आहे. बारामतीतील मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने मुंबईला शिदोरी पाठवण्यात आहे. मोठ्या संख्येने बारामतीकरांनी मुंबईकडे शिदोरी पाठवण्याचा निर्धार केला आहे. याच्यामध्ये भाकरी, चटणी, ठेचा तसेच पाण्याच्या बाटल्या देखील देणार असल्याचं बारामतीकरांनी सांगितलं मनोज जरांगे पाटील मुंबईकडे जात असताना बीडमधील सतीश देशमुख यांचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला होता. कुटुंबाच्या दुःखापेक्षा समाजाचं दुःख मोठं असल्याने मी हे जेवणाचे साहित्य मुंबईला घेऊन जात असल्याचे सांगत जाधव हेही भाकऱ्या घेऊन मुंबईला पोहोचले.

मुंबईतील समाज बांधवांसाठी भाकरी,धपाटे यासह जेवणाचे साहित्य घेऊन आझाद मैदानाकडे ते रवाना झाले होते. घाटनांदुर,अंबाजोगाई,केज

◆ पान ४ वरून पुढे...

तालुक्यातुन हे साहित्य जमा केले. मुंबईतील आंदोलन विस्कळीत करण्याचं सरकारचं षडयंत्र आहे.हे जेवण साहित्य जमा करण्यासाठी मुस्लीम,धनगर आणि इतर बांधवांचाही हातभार लागल्याचे ते म्हणाले. मुंबईतील आझाद मैदानावर मराठा आरक्षणासाठी संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी सुरु केलेल्या उपोषणाला समर्थन देण्यासाठी गेलेल्या आंदोलकांना मोठ्या प्रमाणावर अन्नधान्याची मदत निलंगा तालुक्यातून रवाना करण्यात आली. निलंगा तालुक्यातील महिला, शेतकरी आणि सर्वधर्मीय नागरिकांनी उत्स्फूर्तपणे पुढाकार घेत आंदोलकांसाठी भाकरी, चटणी, धपाटी, दसमी, लोणची, बिस्किटांचे पुडे, औषधे अशा विविध वस्तू तयार करून पाठविल्या.

मराठा आरक्षणाच्या लढ्यासाठी मनोज जरांगे यांचं मुंबईत उपोषण सुरू असून त्यांच्या उपोषणाचा आजचा तिसरा दिवस आहे. मात्र आंदोलकांना अन्न पाण्याची सोय नसल्याचे समोर आल्यानंतर आता बीडकर पुढे धजावल्याचं दिसून आलं. आंदोलकांना निदान दोन वेळचे जेवण मिळावे. यासाठी बीडकरांनी पुढाकार घेतला आहे. बीडच्या गांधनवाडी, पांढरवाडी, सकुंडवाडी, उंडेवाडी, कोतन, खलाटवाडी या गावांतून ३० ते ३५ हजार भाकऱ्या, चटणी, ठेचा आणि लोणच्याची शिदोरी मुंबईला रवाना करण्यात आली आहे. लातूरमधून तब्बल २० हजार भाकरी आणि २०० किलो शेंगा चटणी मुंबईकडे रवाना करण्यात आली असून, या माध्यमातून लातूरकरांनी आंदोलकांना पाठिंबा दिला आहे.

## माजलगाव शहरात...

जाणार आहेत. या कार्यक्रमासाठी भाजपा चे माजलगाव शहर सरचिटणीस पवन मोगरेकर, भाजपा माजलगाव शहर उपाध्यक्ष अविनाश कांडुरे व भाजपा पदाधिकारी नामदेव मुळे हे परीक्षण करत आहेत. गणेश विसर्जनानंतर लवकरच गणराया अवॉर्ड योजनेचे बक्षीस एक छान सा कार्यक्रम घेऊन सर्व विजेत्यांना दिले जाईल असे आवाहन या कार्यक्रमाचे आयोजक भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य, परशुराम हिंदू सेवा संघांचे प्रदेश संघटन सरचिटणीस तथा सिद्धीविनायक अर्बन चे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रशांत पाटील यांनी केले आहे.

## बाबुरावजी आडसकर ...

◆ पान ४ वरून पुढे...

पत्त्यावर पाठवावा. वक्तृत्व स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांचे ओळखपत्र गरजेचे आहे. जिल्हास्तरीय वक्तृत्व व निबंध स्पर्धेमध्ये प्रथम , द्वितीय व तृतीय क्रमांक येणाऱ्या स्पर्धकांना रोख रक्कम, प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. या जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये जास्तीत जास्त शाळा महाविद्यालयाने सहभाग घेऊन विद्यार्थ्यांना या स्पर्धेमध्ये सहभागी करावे असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ माधव फावडे, संयोजक डॉ. चत्रभुज सोळंके , डॉ. रामचंद्र केदार , डॉ. मनोज माने, डॉ. सुनील राऊत, डॉ. प्रशांत क्षीरसागर , डॉ. प्रकाश खुळे, डॉ. आशा बोबडे , डॉ. बाबासाहेब हिरवे , संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## आंतरराष्ट्रीय 'भारत...

शिवकुमार स्वामी साहेब, इतर मागास प्रवर्ग विकास विभागाचे संचालक दत्तात्रय क्षिरसागर, जात पडताळणी समितीच्या अध्यक्षा मेश्राम मॅडम, लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे यांच्यासह मान्यवर मंडळींच्या उपस्थितीत सन्मानित करण्यात आले. जामखेड तालुक्यातील मौजे डिघोळ येथील हभप रामायणाचार्य संजय सिताराम गित्ते महाराज यांच्या साहित्य, संगीत, योग व सामाजिक कार्याच्या ४५ वर्षाच्या प्रदिर्घ साधनेची दखल घेऊन आंतरराष्ट्रीय पातळीवरील भारत गौरव सन्मान २०२५ या पुरस्काराने आज रविवार दिनांक ३१ ऑगस्ट २०२५ रोजी बीड शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे जागतिक भटके विमुक्त दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात हभप संजय महाराज गित्ते यांना बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदरणीय जितीन रहेमान, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, मेडल, शाल श्रीफळ देऊन सन्माननीत करण्यात आले. यावेळी नॅशनल अनिमल्स वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडिया चे सदस्य तथा गोसेवक संतोष गर्जे महाराज, लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे, भटक्या विमुक्त विकास परिषदेचे देवगिरी प्रांत संयोजक उमेश जोगी, मातृभुमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ संजय तांदळे, भगवान पवार, बबन गिरी, ओमप्रकाश गिरी,भटक्या विमुक्त जाती परिषद महिला जिल्हा संयोजक माळी, सामाजिक कार्यकर्त्या मनिषा स्वामी, मसानजोगी समाजाचे जातपंचायत पंच हनुमंत मोरे इत्यादी मान्यवर मंडळींची उपस्थिती होती.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# मराठा आंदोलकांचा सुप्रिया सुळेंना घेराव

## मनोज जरांगे पाटलांची पहिली प्रतिक्रिया, नेमकं काय म्हणाले?

**मुंबई । प्रतिनिधी**

मनोज जरांगे पाटील मराठा आरक्षणासाठी मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलन करत आहेत. त्यांच्या उपोषणाचा आज तिसरा दिवस आहे. आज खासदार सुप्रिया सुळे यांनी आझाद मैदानावर जात जरांगे पाटलांच्या तब्येतीची विचारपूस केली. मात्र जरांगे पाटील झोपले असल्याचे या दोघांमध्ये कोणतीही खास चर्चा झाली नाही. मात्र आझाद मैदानातून बाहेर पडत असताना सुप्रिया सुळे यांना घेरण्याचा प्रयत्न मराठा आंदोलकांकडून करण्यात आला. यावर आता जरांगे पाटलांनी प्रतिक्रिया दिली आहे.

सुप्रिया सुळेंना घेरलं- मनोज जरांगे यांची भेट घेतल्यानंतर सुप्रिया सुळे आझाद मैदानातून बाहेर पडत होत्या. यावेळी त्यांना मराठा आंदोलकांनी घेराव घातला. यावेळी काही आंदोलकांनी खासदार शरद पवार यांच्याविरोधातही घोषणाबाजी केली. एका आंदोलकाने तर शरद पवार यांनी मराठ्यांचे वाटोळे केले आहे, असा आरोप केला. काही आंदोलकांनी सुप्रिया सुळे यांच्या कारचा पाठलाग केला. तसेच सुळे




यांच्या कारवर काही लोकांनी बॉटलही फेकल्या होत्या.

काय म्हणाले जरांगे पाटील?- या घटनेवर बोलताना जरांगे पाटील म्हणाले की, 'कोणताही नेता आला तर त्यांना त्रास देऊ नका, तो आपला दुश्मन जरी असला तरी त्याला सन्मान द्यायला शिका. अन्यथा आपल्याकडे नेते यायला भेतील. नेते आल्यावर तुम्ही गोधळ घालत असाल तर तुमच्याकडे कोणीही येणार नाही. जोपर्यंत सहन होत आहे तोपर्यंत नेत्यांचा सन्मान करा. ज्यावेळेस असं वाटेल की, आरक्षण भेटत नाही, त्यावेळेस पाहू काय करायचं आहे ते.'

कोणत्याही पक्षाचा नेता आला तर त्याला माघारी बोलू नका, त्याला सन्मानाने येऊद्या आणि सन्मानाने जाऊ द्या. गोंधळ घालणारे कोण आहेत ते पहावं लागेल. ते सरकारने पाठवलेले आहेत का? माझे लोक असं करत नाहीत, ते सरकारचेच असू शकतात. त्यांना दंगल घडवायची आहे. त्यामुळे पोरांनी सावध रहायला हवं असंही जरांगे पाटलांनी म्हटलं आहे. मनोज जरांगे पाटलांच्या आंदोलनाला आणखी एका दिवसाची मुदतवाढ- मनोज जरांगे पाटलांच्या आंदोलनाचा आज तिसरा दिवस आहे. आज सायंकाळी या आंदोलनाची मुदत संपली होती, मात्र मुंबई पोलिसांनी आणखी एका दिवसासाठी या आंदोलनाला परवानगी दिली आहे. आता उद्याही मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलन सुरु राहणार आहे. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मुंबई पोलिसांचे पथक, क्यूआरटी, आरएएफ तसेच विशेष दल सोमवारीही मुंबईत तैनात राहणार असल्याची माहिती समोर आली आहे.

## मनोज दादा जरांगे यांच्या मागण्या मान्य करून मराठा आरक्षणाचा तातडीने तोडगा काढा: आ. संदीप क्षीरसागर

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबईतील आझाद मैदानावर मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी संघर्षयोद्धा मनोज दादा जरांगे पाटील हे तीन दिवसांपासून आमरण उपोषणाला बसले असून त्यांच्या मागण्या मान्य करून मराठा आरक्षणाचा तातडीने तोडगा काढण्याची मागणी संदीप क्षीरसागर यांनी केली आहे.



शनिवारी सकाळी राज्य मंत्रिमंडळाच्या मराठा आरक्षणावरील बैठक पार पडली. या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यातील आ. प्रकाश सोळंके, आ. सुरेश धस, आ.संदीप क्षीरसागर, आ. विजयसिंह पंडित या चार विधानसभा सदस्यांनी मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष तथा मंत्री. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या निवासस्थानी बैठकीस उपस्थित राहून मराठा आरक्षण तातडीने सोडवण्याची मागणीचे निवेदन दिले. यावेळी बैठकीत उपस्थित असलेले आ.संदीप क्षीरसागर यांनी मनोज दादा जरांगे यांच्या मागण्या मान्य करून मराठा आरक्षणाचा तातडीने तोडगा काढाव्यात अशी ठोस भूमिका मांडली. आंदोलन करणे हा लोकशाहीतील एक मूलभूत अधिकार आहे याची जाणीव करून देत आझाद मैदान परिसरात आंदोलनकर्ते मराठा समाज बांधवांना सर्व मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी सुद्धा आ.संदीप क्षीरसागर यांनी केली. या बैठकीत ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले, ना.दादा भुसे, ना.बाबासाहेब पाटील, ना.मकरंद आबा पाटील, ना.माणिकराव कोकाटे उपस्थित होते.

### ●मराठा आरक्षण आंदोलनाच्या पहिल्याच दिवशी आ.संदीप क्षीरसागरांनी सहभागी होऊन दिला पाठिंबा

**मुंबईच्या आझाद मैदानावर मराठा समाज आरक्षण मिळावे याकरिता उपोषणासाठी बसलेले मनोज जरांगे यांची आ. संदीप क्षीरसागर यांनी पहिल्याच दिवशी आझाद मैदानावर जाऊन भेट घेऊन आंदोलनाला जाहीर पाठिंबा देत आंदोलनात सहभाग नोंदवला होता. तसेच आपण या आंदोलनाच्या लढ्यात मनोज दादा जरांगे यांच्यासोबत असल्याचे माध्यमांशी बोलताना सांगितले होते. आ.संदीप क्षीरसागर हे सुरुवातीच्या काळापासून मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे यांना पाठिंबा देत आहेत.**



*ना,पंकजाताई गोपीनाथजी मुंडे साहेब यांच्या नेतृत्वाखाली मा,खा,डॉक्टर प्रीतमताई गोपीनाथजी मुंडे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली वैद्यनाथ बँक परळी ची निवडणूक बिनविरोध झाल्यामुळे त्यांना प्रत्यक्ष यशश्री निवासस्थानी भेटून हार्दिक हार्दिक अभिनंदन शुभेच्छा देताना द्वारकाधीश मित्र मंडळ बीड*

## विविध सामाजिक उपक्रमांनी बीड तालुक्यात काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचा वाढदिवस साजरा होणार : गणेश बजगुडे पाटील



**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन दादा सपकाळ यांचा आज ३१ ऑगस्ट २०२५ रोजी ५७ वा वाढदिवस साजरा होत असुन बीड तालुका काँग्रेस पक्षाच्या वतीने बॅनर, होर्डिंग, जाहिरातीवरील खर्चाला फाटा देत बीड तालुक्यातील निराधार, अनाथ, आत्महत्या ग्रस्त शेतकरी कुटुंब व पाल्यांना मदत त्याचबरोबर रक्तदान शिबिर, महाभिषेक, फलवाटप, शालेय साहित्य वाटप यासारख्या विविध सामाजिक उपक्रमांनी तालुकाभरात प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचा वाढदिवस साजरा करण्यात येणार असल्याची माहिती तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील यांनी दिली.



*बीड शहरातील लक्ष्मण नगर फुलेनगर येथील शिवाजी गणेश मंडळ श्री ची आरती करताना या प्रभागाचे भाग्यविधाते लोकप्रिय माजी सभापती नवनाथांना शिराळे पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आले यावेळी परिसरातील दीपक जाधव सिद्धार्थ जाधव दीपक शेरकर महेंद्र वाघमारे तेलंग योगेश नाकाडे जावळे भैय्या इत्यादी सामाजिक कार्यकर्ते पदाधिकारी महिला मंडळ यावेळी प्रचंड संख्येने उपस्थित होते.*

## अंथरवण पिंपरी आश्रमशाळेत भटके विमुक्त दिन उत्साहात साजरा

**बीड । प्रतिनिधी**

श्री सद्गुरु बंजारा सेवा संघ, अंथरवण पिंपरी संचलित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेच्या प्रांगणात भटके विमुक्त दिन दि. ३१ ऑगस्ट २०२५ रोजी मोठ्या उत्साहात व अभिमानाने साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात हरितक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य खंदारे सर, तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे अध्यक्ष मा. दिनेशरावजी पवार साहेब उपस्थित होते. याशिवाय मुख्याध्यापक शिंदे सर, पर्यवेक्षक जवरे सर आणि प्राध्यापक पवार एस. सी. सर यांची व्यासपीठावर उपस्थिती लाभली. या विशेष प्रसंगी विद्यार्थ्यांनी विविध भाषांमधून भटके-विमुक्त समाजाच्या इतिहासावर, आजच्या समस्यांवर व भविष्यातील दिशा यावर प्रभावी भाषणे सादर केली. यानंतर प्राचार्य खंदारे सर, शिंदे सर, जवरे सर, पवार सर, तसेच जाधव एन. जे. सर यांनी मार्गदर्शन करत भटके-विमुक्त समाजाच्या संघर्षमय इतिहासाची माहिती दिली.

## इंजि. देविसिंह शिंदे यांच्या विनंतीला मान देऊन ना. नरेंद्र पाटील यांनी मराठा आंदोलकांसाठी केले मुंबईत माथाडी भवन खुले

**बीड । प्रतिनिधी**

आपल्या शैक्षणिक सामाजिक व आर्थिक उज्वल भवितव्यासाठी व भावी पिढीच्या सुरक्षिततेसाठी अवघा गरीब गरजवंत मराठा समाज मराठा कुणबी आरक्षणाच्या आंदोलनासाठी आझाद मैदान मुंबई येथे एकवटलेला असताना त्यांची राहण्याची व निवासाची गैरसोय होत असल्यामुळे त्यातील बरेच जणांनी बीडचे जिजाऊ प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष इंजि. देविसिंह शिंदे यांच्याशी संपर्क केला असता, त्यांनी दिनांक २८ ऑगस्ट पासूनच पहाटे ५ वाजेपर्यंत शक्य होईल तितक्या जणांची राहण्याची व्यवस्था मुंबईत वाशी, पनवेल सह इतर सर्व भागात ठिकठिकाणी केली. पण येणारी प्रचंड संख्या आणि त्याच्या तुलनेने उपलब्ध होणारी जागा, सुविधा, यंत्रणा, मनुष्यबळ तोकडे पडत होते. त्यामुळे अनेक जणांना भर पावसात अनेक संकटांना सामना करत रस्त्यावर पावसात रात्र काढावी लागत होती. सर्वांची राहण्याची व निवाऱ्याची उत्तम सोय केली. आणि तशी माहितीही त्यांनी व्यवस्था झाल्या झाल्या इंजि. देविसिंह शिंदे यांना दिली. व महाराष्ट्रातील सर्व समाज बांधवांसाठी संपर्क क्रमांक उपलब्ध करून तशी माहिती पुरवली. त्यांच्या या कृतिशील तळमळीबद्दल जिजाऊ प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष इंजि. देविसिंह



शिंदे यांनी त्यांचे तमाम मराठा समाज बांधवांच्या वतीने मनापासून जाहीर आभार व्यक्त केले आहेत आणि मुंबईत आंदोलनात सहभागी झालेल्या सर्व मराठा बांधवांनी राहण्यासाठी श्री. सुरज बर्गे - ९१३७७८७६०६ व श्री. दिपक पाटील - ९९२०५५८००८ यांच्याशी संपर्क साधून आपल्या हक्काच्या माथाडी भवनचा लाभ घ्यावा आणि आंदोलनाला बळकटी देत मराठा कुणबी आरक्षण पुर्णपणे कायदेशीररित्या पदरात पाडूनच वापस बीडला यावे, यादरम्यान संपुर्ण रस्त्यात किंवा मुंबईतही अजुन कुठेही काहीही मदत लागली तर त्वरित मला माझ्या ९७६७३०७४४४ या क्रमांकावर संपर्क करा, अशी कळकळीची विनंती जिजाऊ प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष इंजि. देविसिंह शिंदे यांनी केली आहे.

## नामस्मरण हे भगवंताच्या प्राप्तीचे सुलभ साधन आहे; ज्ञानेश्वरी ग्रंथ भेट उपक्रमात; ह भ प माधव महाराज डाके यांचे प्रतिपादन

**बीड । प्रतिनिधी**

ज्ञानियांचे राजे साधकांचे मायबाप कैवल्य चक्रवर्ती सम्राट माऊली श्री. ज्ञानोबाराय यांच्या ७५० व्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त एकावन्न श्री ज्ञानेश्वरी ग्रंथ भेट उपक्रमांतर्गत आज शनिवार दि.३० ऑगस्ट २०२५ रोजी बीड शहरातील वाडिया वाचनालयाचे ग्रंथपाल गणेश शेंडगे यांच्या घरी मोठ्या उत्साही व आनंदी वातावरणात ज्ञानेश्वरी ग्रंथाचे भव्य दिव्य स्वागत झाले.

यावेळी ग्रंथराज ज्ञानेश्वरी ची ज्ञानदेव तुकाराम या गजरात मिरवणूक काढण्यात आली होती. उपक्रमाचे संयोजक ह.भ.प.माधव महाराज डाके यांनी ज्ञानेश्वरी ग्रंथाची विधिवत पूजा करून सदरील ग्रंथ गणेश शेंडगे व त्यांच्या धर्मपत्नी शेंडगे ताई यांच्या हातात सुपूर्द केला. या नंतर डाके



महाराजांनी ज्ञानेश्वरीतील नवव्या अध्यायातील नामजपाचे महात्म्य सांगणारी ओवी निवडून तासाभराचे श्री ज्ञानेश्वरी ग्रंथाचे महात्म्य सांगणारे प्रवचन केले. सदरील या ओवीवर चिंतन मांडताना श्री ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरी ग्रंथात नाम साधनेचे महत्व कसे प्रतिपादन केले आहे ते सांगितले.भगवंत प्राप्तीचे विविध मार्ग आहेत. परंतु यामध्ये सर्वात सुलभ साधना नामस्मरणआहे. हा सिद्धांत विविध दृष्टांत देऊन जमलेल्या श्रोत्यांना आपल्या सोप्या भाषेत पटवून दिले . या प्रवचन सेवेमध्ये ज्ञानेश्वर माऊलींनी लिहिलेला हरिपाठ, चांगदेव पासष्टी ,अमृत अनुभव व ज्ञानेश्वरी ग्रंथ यावर सविस्तर भाष्य केले .साधकांचे मायबाप ज्ञानोबारायांना माऊली का म्हटले जाते याचे उत्तर आपणास हरिपाठ मध्ये मिळते हे विशद केले.

## महाराष्ट्र आधार सेना च्या सत्यशोधक पुरस्कार वितरण सोहळ्याला हजारोच्या संख्येने उपस्थित रहा : मिलिंद पाटोळे

**वडवणी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र आधार सेना व सत्यशोधक प्रतिष्ठान थोरातवाडी यांच्या वतीने साहित्यरत्न,लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त दि.६ सप्टेंबर २०२५ शनिवार रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृह बीड या ठिकाणी सत्यशोधक पुरस्कार वितरण सोहळ्याच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे या कार्यक्रमासाठी हजारोंच्या संख्येने उपस्थित रहा असे आवाहन युवा नेते मिलिंद पाटोळे यांनी केले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, सत्यशोधक पुरस्कार सामाजिक, आरोग्य, पत्रकार, पोलीस, राजकीय, कला, विज्ञान, साहित्य, क्रीडा अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार दिला जातो साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त मागील १८ वर्षापासून या पुरस्काराचे वितरण केले जात आहे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी सत्यशोधक पुरस्काराचे वितरण सोहळ्याचे आयोजन महाराष्ट्र आधार सेना चे संस्थापक, अध्यक्ष तथा सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ चे संपादक मा.दिपक भाऊ थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली केलेले असून विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना यावर्षी महाराष्ट्र आधार सेना च्या वतीने ६ सप्टेंबर २०२५ शनिवार रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड या ठिकाणी माजी मंत्री धनंजय मुंडे, माजी आमदार अमरसिंह पंडित, देवदूत डॉ.ओम प्रकाश शेटे, बीड प्रसार चे संपादक काझी समीरोद्दीन यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये सत्यशोधक पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे. अठरापगड जातीतील लोकांसाठी अहोरात्र काम करत असताना दिपक भाऊ थोरात साहेब यांनी लोकांच्या वेदना समजून घेऊन त्यांच्यासाठी आपले जीवन अर्पण केलेले आहे दवाखान्यातील,पोलीस स्टेशन मधील,तहसील मधील, पंचायत समिती मधील इतर कुठल्याही काम असो दिपक भाऊ थोरात निस्वार्थपणे कोणाकडूनही एक रुपयाची अपेक्षा न ठेवता मदत करतात समाजातील वंचित, शोषितांचे प्रश्न सोडवतात त्यामुळे काम करणाऱ्या आपल्या दिपक भाऊंच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहिले पाहिजे जेणेकरून त्यांना लढण्यासाठी अजून बळ व ऊर्जा मिळेल.

विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करताना ज्यांनी आपले जीवन आपल्या कार्यासाठी अर्पण केलेले असून त्यांच्या कार्याचे कौतुक व्हावे यासाठी दिपक भाऊ थोरात यांनी सत्यशोधक पुरस्काराची संकल्पना राबवून समाजातील विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार देऊन त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप दिलेली आहे त्यामुळे त्या व्यक्तींना आणखीन चांगलं काम करण्यासाठी बळ मिळेल या उद्देशाने हा पुरस्कार दिला जातो. सत्यशोधक पुरस्कार वितरण सोहळ्याच्या कार्यक्रमाला मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे आपणही हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन युवा नेते मिलिंद पाटोळे यांनी केले आहे.

दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर
• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • सोमवार, दि. ०१ सप्टेंबर २०२५ • पान ४




*श्री राजू डोके यांची सहाय्यक संचालक, महाराष्ट्र वित्त व लेखासेवा वर्ग - १, जालना या ठिकाणी निवड झाल्याबद्दल बीड येथे आल्यानंतर सत्कार करताना व पुढील कार्यासाठी शुभेच्छा देताना सिद्धेश्वर सांगुळे.*

# लिंबागणेशहून आंदोलकांसाठी चटणी-भाकरी, गोडधोड रवाना

## आमची हैसत बघता काय ? आम्ही तुम्हांलाही पोसू - फुलाबाई घाडगे यांची सरकारवर चपराक

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

मुंबईतील आझाद मैदानावर मराठा आरक्षण चळवळीतील संघर्षयोद्धा मनोजदादा जरांगे पाटील उपोषणाला बसले असून त्यांना साथ देण्यासाठी राज्यभरातील मराठा बांधव मोठ्या संख्येने दाखल झाले आहेत. सरकारने आझाद मैदान परिसरातील हॉटेल बंद ठेवले असल्याने आंदोलनकऱ्यांच्या जेवण-पाण्याची मोठी गैरसोय निमाण झाली आहे. या पार्श्वभूमीवर बीड



तालुक्यातील लिंबागणेशकरांनी आंदोलकांसाठी शिदोरीची मोठी व्यवस्था केली आहे. यामध्ये ५ क्विंटल बुंदी, ५ हजार भाकऱ्या, २ क्विंटल चिवडा, ५०० पाणी बॉक्स आदी साहित्य मुंबईला



रवाना करण्यात आले. याचबरोबर मेंगडेवाडी, वाघिरा, वडवणी येथील बांधवांनीही खाण्यापिण्याचे साहित्य पाठवले आहे. धनगर बांधवांनी शिदोरीसोबत वाहनांसाठी इंधनाची सोय केली तर मुस्लिम बांधवांनी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली. गावातील बहुजन समाज बांधवांनी देखील जरांगे पाटलांच्या आंदोलनाला ठाम पाठिंबा देत मदतीचा हात पुढे केला आहे. दरम्यान, आंदोलनामुळे उपाशीपोटी राहणाऱ्या लेकरांची अवस्था पाहून फुलाबाई घाडगे संतप्त झाल्या. सरकारला जाब विचारत त्यांनी ठाम शब्दांत हाक दिली - आमची हैसत बघता काय ? आम्ही तुम्हांलाही पोसू!

## थोडक्यात...

### मराठा आरक्षण योद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी आज रास्ता रोको आंदोलने



**लिंबागणेश । प्रतिनिधी**

मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातुन आरक्षण मिळावे या प्रमुख मागणीसह मराठा आणि कुणबी समाज एकच असल्याची अंमलबजावणी व्हावी, हैद्राबाद -सातारा- मुंबई गॅझेट लागू करण्यात यावे, मराठा आरक्षण आंदोलनातील सरसकट गुन्हे मागे घेण्यात यावेत आदी मागण्यांसाठी संघर्ष योद्धा मनोजदादा जरांगे पाटील काल दि.२९ पासुन आझाद मैदान मुंबई येथे उपोषणाला बसले असुन त्यांच्या न्याय मागण्याला पाठींबा देण्यासाठी व मागण्या सरकारने तातडीने मान्य कराव्यात यासाठी मराठा सेवक डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली दि.१ सप्टेंबर सोमवार रोजी अहमदपूर ते अहमदनगर ५४८ डी राष्ट्रीय महामार्गावरील मांजरसुंभा ते पाटोदा दरम्यान लिंबागणेश शिवतीर्थ याठिकाणी रास्तारोको आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन जिल्हाधिकारी बीड, पोलिस अधिक्षक बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना पाठवले असुन मोठ्या संख्येने लिंबागणेश पंचक्रोशीतील सकळ मराठा बांधवांनी आंदोलनात सहभागी व्हावे असे आवाहन डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केले आहे.

### शेख एहेतेशामुद्दीन यांची काँग्रेसच्या शहरा उपाध्यक्षपदी निवड



**बीड । प्रतिनिधी**

बीड शहर काँग्रेसच्या उपाध्यक्षपदी नुकतीच युवा नेतृत्व शेख एहेतेशामुद्दीन शेख काजिमुद्दीन यांची निवड झाली आहे त्यांना निवडीचे नियुक्तीपत्र महाराष्ट्र राज्य प्रदेश सरचिटणीस दादासाहेब मुंडे व प्रदेश सरचिटणीस गणेश राऊत, निराधार विभागाचे जिल्हाध्यक्ष शेख मोहसीन बुरानोद्दीन, तालुकाध्यक्ष जहीर भाई, बीड शहरध्यक्ष परवेज कुरेशी यांची उपस्थितीमध्ये देण्यात आले. सुरुवातीला निवड सत्कारावेळी सांगण्यात आले की, या अगोदर शेख एहेतेशामुद्दीने यांनी नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी व समाजसेवेसाठी सातत्याने योगदान दिले आहे त्यांच्या निवडीमुळे काँग्रेस पक्षाला बळकटी येईल व पुन्हा सोनियाचे दिवस येतील त्यांचे यापुर्वी काम पाहता ही निवड करण्यात आली आहे. यावेळी सत्कारास प्रत्युत्तर देतांना शेख एहेतेशामुद्दीन म्हणाले की, सरकार चुकेल तिथे काँग्रेस पक्षाची विचारधारा लावून तो प्रश्न सोडविण्यासाठी जिवाचे रान करु व पुन्हा एकदा काँग्रेस पक्षाला भरभराटी येईल यासाठी प्रयत्न करु. त्यांच्या या निवडीचे शेख सोहेल, कामरान खान, जावेद भाई, ॲड.सय्यद मोईन, रिजवान पटेल, सय्यद सलमान, अजहर शेख, साजिद खान, अयान पाशा आदींनी स्वागत केले आहे.

### आनंदऋषीजी हॉस्पिटल बीड येथे रोज मोफत आरोग्य तपासणी

**बीड । प्रतिनिधी**

गेल्या पाच वर्षापासून बीड येथे जैन सोशल फेडरेशन अहिल्यानगर व सकल जैन समाज बीड यांच्या सहकार्याने हॉस्पिटल कार्यरत आहे हा अनुभव घेता बीड शहरातील व आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांसाठी दानशूर व्यक्तींच्या आर्थिक सहकार्याने रोज सकाळी दहा ते दोन या वेळेमध्ये मोफत जनरल आरोग्य तपासणी करण्याचा उपक्रम हाती घेतला असून या तपासणी करिता बीड शहरातील सुप्रसिद्ध डॉक्टर राजेश पारीख यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे गेली २५ वर्षाचा मेडिकल क्षेत्रातील सेवेचा त्यांना अनुभव आहे त्यामध्ये त्यांचे नाव लौकिक आहे आलेल्या रुग्णांना आजारातून सावरण्या करिता त्यांना धीर देणे आजार समजावून सांगणे त्यामध्ये त्यांचे आहार व दिनचर्या समजावून सांगणे योग्य तेवढीच औषधी देणे असा उपक्रम गेल्या पंचवीस वर्षापासून ते बीड शहरात सेवा करत आहे मूळ वैद्यकीय सेवेचा पाया त्यांनी २५ वर्षापासून कायम ठेवलेला आहे हाच धागा पकडून जैन सोशलच्या विश्वस्तांनी त्यांना रोज चार तास सेवा द्यावी ही विनंती केल्यामुळेच त्यांनी सुद्धा ३२ वर्षाचा मेडिकल क्षेत्राचा अनुभव असलेल्या संस्थेशी त्यांनी काम करण्यास होकार दिला अतिशय मितभाषी आपल्या वैद्यकीय सेवेचा आदर ठेवून असलेले डॉक्टर राजेश पारिक हॉस्पिटलमध्ये रोज सकाळी दहा ते दोन या वेळेमध्ये आलेल्या रुग्णांना तपासणार असून योग्य ती कमीत कमी पैशाची औषधे देऊन त्यांना दुरुस्त करण्याचा संकल्प आनंद ऋषीजी हॉस्पिटल जालना रोड शाहू बँकेच्या बाजूला आहे

# माजलगाव शहरात गणराया अवार्ड : योजना डॉ. प्रशांत पाटील

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील गणेश मंडळांसाठी भारतीय जनता पार्टी व परशुराम हिंदू सेवा संघ यांच्या वतीने गणराया अवार्ड योजना आयोजित करण्यात आली आहे. यात पहिले बक्षीस रु. ११०००/- ट्रॉफी व प्रमाणपत्र, दुसरे बक्षीस रु.७०००/- ट्रॉफी व प्रमाणपत्र, तिसरे बक्षीस रु.५०००/- ट्रॉफी व प्रमाणपत्र दिले जाणार असून उत्तेजनार्थ अजून काही ट्रॉफी दिल्या जाणार आहेत.

तरी या योजनेमध्ये माजलगाव तालुक्यातील सर्व गणेश मंडळानी सहभाग घ्यावा असे आवाहन माजलगाव शहर मंडल अध्यक्ष




विनायक रत्नपारखी यांनी केले आहे. यासाठी आयोजकांनी खालील प्रमाणे गुण देण्याचे ठरवलेले आहे.

१) पर्यावरण पूरक गणपती = १० गुण, २) स्वदेशी विषयी जनजागृती सजावट / देखावे = ४० गुण, ३) ऑपरेशन सिंदूर विषयी देखावे / सजावट = ३० गुण, रक्तदान शिबीर / वैद्यकीय सेवा शिबीर २० गुण असे गुण देण्यात येणार आहेत.

यासाठी पोलीस स्टेशनची परवानगी काढलेले व डी जे मुक्त मिरवणूक काढणारे गणेश मंडळ पात्र असतील. तरी माजलगाव तालुक्यातील सर्व गणेश मंडळानी गणेश उत्सवानिमित्त दहा दिवसांमध्ये घेतलेले वरील गुणांकाचे व वेगवेगळे कार्यक्रम / उपक्रम आम्हाला कळवावेत किंवा ९९२२२२४०३८ या नंबर वर टाकावेत असे आवाहन केले आहे. ज्या गणेश मंडळाला जास्त गुण मिळतील त्या गणेश मंडळास पहिले, दुसरे, तिसरे व उत्तेजनार्थ बक्षीस दिली ▶▶ उर्वरित पान २ वर

### बाबुरावजी आडसकर महाविद्यालयात जिल्हास्तरीय वक्तृत्व व निबंध स्पर्धेचे आयोजन

**केज । प्रतिनिधी**

श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था आडस संचलित बाबुरावजी आडसकर महाविद्यालय येथे सांस्कृतिक विभाग व भाषा विभागाच्या वतीने जिल्हास्तरीय वक्तृत्व व निबंध स्पर्धेचे आयोजन ३ सप्टेंबर रोजी करण्यात आले आहे. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सामाजिक व भाषा विषयक ज्ञान वृद्धीसाठी सामाजिक व शैक्षणिक विषयावर जिल्हास्तरीय वक्तृत्व व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेमध्ये इयत्ता आठवी ते पदवी पर्यंतचे सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी सहभागी होऊ शकतात. स्पर्धा विनाशुल्क आहे . जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा दिनांक ३ सप्टेंबर २०२५ रोजी सभागृह बाबुरावजी आडसकर महाविद्यालय केज या ठिकाणी सकाळी दहा वाजता होणार आहे निबंध स्पर्धेचे विषय तीन ठेवण्यात आले आहेत यापैकी एका विषयावर स्पर्धकांनी निबंध लिहायचा आहे. या विषयापैकी मोबाईलचा वापर अभ्यास पूरक किंवा मारक, आजचा विद्यार्थी व संस्कार, माझा शेतकरी बाप जगाचा पोशिंदा जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेसाठी लोकनेते बाबुरावजी आडसकर साहेब कार्य व कर्तुत्व , आजचे राजकारण व लोकशाही, जिल्हास्तरीय निबंध स्पर्धेसाठी यापैकी एका विषयावर मराठी , हिंदी किंवा इंग्रजी भाषांमध्ये स्वहस्ताक्षरात निबंध लिहून दिनांक ३ सप्टेंबर २०२५ रोजी पर्यंत स्वहस्ते किंवा पोस्टाने भाषा विभाग, बाबुरावजी आडसकर महाविद्यालय केज जिल्हा बीड या

▶▶ उर्वरित पान २ वर

# आंतरराष्ट्रीय 'भारत गौरव सन्मान 2025'ने हभप रामायणाचार्य संजय सिताराम गित्ते महाराज सन्माननीत

**बीड । प्रतिनिधी**

हभप रामायणाचार्य संजय सिताराम गित्ते महाराज नमस्कार ग्रुप गाझियाबाद यांच्या वतीने दिल्या जाणाऱ्या भारत गौरव सन्मान २०२५ या देशातील सर्वोच्च पुरस्काराने बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदरणीय जितीन रहेमान , निवासी उपजिल्हाधिकारी

▶▶ उर्वरित पान २ वर





*नामदार पंकजाताई साहेब मुंडे यांच्या मुंबई येथील रामटेक निवासस्थानी जाऊन बीड जिल्हा भाजपा कार्यकारिणीत गणेश लांडे यांना जिल्हा सरचिटणीस पद दिल्याबद्दल ताई यांचे आशिर्वाद घेऊन आभार मानून त्यांचा सत्कार केला तसेच त्यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाचे दर्शन घेतले!*

# काँग्रेस चे प्रदेश अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचा वाढदिवस बीड जिल्ह्यात विविध सामाजिक उपक्रम घेऊन साजरा

**बीड । प्रतिनिधी**

काँग्रेस चे प्रदेश अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचा वाढदिवस बीड जिल्ह्यात विविध सामाजिक उपक्रम घेऊन साजरा, , बीड प्रतिनिधी. ,, रविवार दि , ३१ ,, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी चे अध्यक्ष कर्मयोगी हर्षवर्धन सपकाळ साहेब यांचा प्रदेश काँग्रेस अध्यक्ष झाले नंतर पहिला वाढदिवस बीड जिल्हा काँग्रेस कमिटी चे अध्यक्ष राहुल भैया सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली ठरलेल्या नियोजना प्रमाणे साजरा करण्यात आला सकाळी नऊ वाजता गोरक्षनाथ टेकडी येथे जाऊन अभिषेक करून सपकाळ साहेब यांना दीर्घ व निरोगी




आयुष्य लाभो ही प्रार्थना केली नंतर गणेश राऊत,, चिटणीस ,, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी, यांनी आयोजित केलेल्या,समाजसेवक गोवर्धन दराडे सर यांनी ढेकणमोह जवळ तयार केलेल्या पसायदान सेवा प्रकल्प येथे १०० अनाथ मुलांना एकवेळ चे भोजन व शालेय साहित्य वाटप करण्यात आले, या प्रसंगी प्रदेश काँग्रेस कमिटी चे सरचिटणीस दादासाहेब मुंडे प्रदेश काँग्रेसचे चे सेक्रेटरी गणेश राऊत , काळेगाव चे बीड तालुका काँग्रेस चे सरचिटणीस संदीपान पवार, यांची समायोचीत भाषणे झाली नंतर एक वाजता बीड येथील शेंहनशाह वली दर्गा येथे जाऊन चादर चढवण्यात आली , नंतर सिटी ब्लड बँक येथे काँग्रेसचे बीड शहर अध्यक्ष परवेज कुरेशी यांनी आयोजित केले होते तेथे रक्तदान केले, या कार्यक्रमाला कराड जिल्हा सातारा येथून आलेले उद्योजक विक्रम जी वेताळ. प्रकाश कांबळे विद्यार्थी काँग्रेसचे बीड जिल्हा अध्यक्ष अविनाश डरपे, ब्रम्हगाव चे काँग्रेसचे तालुका सचिव रमेश ठाकूर, काळेगाव चे माजी सरपंच विकास राऊत, गणेश होंडे काँग्रेसचे सर्कल प्रमुख भगवान देवकते बंडू चौरे, गणेश होंडे, नितीन साळुंके इत्यादी उपस्थित होते.